पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रिय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/कावि/४३ /२०२०
दि. २९ /०१/२०२०

प्रति,

मा.-----------------------------
सदस्य/सदस्या इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समिती मासिक सभा शुक्रवार दि. ०७/०२/२०२० म. ११=०० रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०२०ची मासिक सभा शुक्रवार दि. ०७/०२/२०२०म. ११=०० "संत ज्ञानेश्वर महाराज सभागृह" इ क्षेत्रिय कार्यालय, भोसरी-३९येथे आयोजित करणेत आली आहे .सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत- १) सर्व संबधित प्रमुख
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक -१०

दिनांक- दि. ०७/०२/२०२० वेळ- स. ११=०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे जानेवारी २०२०ची मासिक सभा शुक्रवार दि. ०७/०२/२०२०स. ११=०० "संत ज्ञानेश्वर महाराज सभागृह" इ क्षेत्रिय कार्यालय, भोसरी-३९येथे आयोजित ककरणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ ) शुक्रवार दि.०३/०१/२०२० रोजी झालेल्या मासिक सभेचा (कार्यपत्रिका क्र.०९ सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्र.०१) -पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हुतात्मा चापेकर सार्वजनिक वाचनालय, चिंचवड यानां महाराष्ट्र शासनाचा "ब" दर्जा प्राप्त असुन त्यांना अनुदान प्राप्त होत आहे. तसेच सार्वजनिक वाचनालय विभागाच्या उपविधी " महाराष्ट्र शासन राजपत्र" नुसार वाचनालयाकरीता ग्रंथ/पुस्तके खरेदी करणेकामी त्रिसदस्य समिती स्थापन करण्यात आलेली असून सदर समितीमध्ये मा. शाखा प्रमुख, मा. शिक्षणाधिकारी, व मा. आयुक्तसो यांनी सुचविलेली ग्रंथालयशास्त्राशी निगडीत अशी व्यक्ती यांच्या शिफारशीनुसार पुस्तके खरेदी करण्यात यावे असे नमुद करण्यात आल्याने मा. शिक्षणाधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडिल दिनांक ०५/१२/२०१९ च्या मान्य प्रस्तावान्वये ३२० पुस्तक/ग्रंथ साहित्य खरेदी करण्यास हरकत वाटत नाही असा अभिप्राय देण्यात आलेला आहे. त्यानुसार कोटेशन नोटीस क्र. १ जा.क्र.भैसावा/कावि/४२/२०१९, दि.२७/१२/२०१९ अन्वये अटी व शर्तीसह प्रसिध्द करून ३२० पुस्तक/ग्रंथ साहित्य खरेदीकामी दरपत्रक मागविण्यात आले असता करण बुक सर्व्हिस, नारायण पेठ, लोखंडे तालीम गणपती मंदिराजवळ, पुणे, कुणाल एजन्सी, नारायण पेठ, लोखंडे तालीम गणपती मंदिराजवळ, पुणे शुभम साहित्य, अप्पा बळवंत चौक, पुणे, या ३ पुरवठा धारकांकडुन कोटेशन प्राप्त झाले आहे .

"इ" क्षेत्रीय कार्यालया मार्फत सार्वजनिक वाचनालयाकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता " पुस्तके व नियतकालिके खरेदी " या लेखाशिर्षावर र.रु. ८६,०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली असून संभाव्य ६ महिन्याच्या तरतुदीमध्ये १,५०,०००/- इतकी वाढीव तरतुद करण्यात आलेली आहे. सदर लेखाशिर्षातून श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालयाकरीता ग्रंथ,(शासन मान्य पुस्तकांसह) वृत्तपत्रे व नियतकालिके, पुस्तके/ग्रंथ खरेदी करण्यात येतात.

शुभम साहित्य, अप्पा बळवंत चौक, पुणे, यांनी, सदर ३२० पुस्तके/ग्रंथ साहित्याचा पुरवठा करणेकामी, सर्वात जादा 21% सुटीचे दरपत्रक सादर केलेले आहे. त्यानुसार शुभम साहित्य, अप्पा बळवंत चौक, पुणे, यांचेकडुन अटी व शर्ती नुसार श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी या शासन अनुदान प्राप्त वाचनालया करिता 320 पुस्तके/ग्रंथ खरेदी करणेकामी 21% सुट दिल्याने त्यांचे दरपत्रक स्विकारण्यात आलेले आहे. सदरचा खर्च " पुस्तके व नियतकालिके खरेदी " या लेखाशिर्षातून अदा करण्यास येणार आहे.

तरी शुभम साहित्य, अप्पा बळवंत चौक, पुणे, यांचेकडून प्राप्त झालेल्या दराप्रमाणे श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी करीता 320 पुस्तके/ग्रंथ खरेदी करणेकामी अंदाजे र.रू. ७०,०००/- च्या किमतीवर येणा-या एकूण किमतीवर 21% सुट र.रू. १४,७००/- वजा जाता र.रू. ५५,३००/- ( अक्षरी र.रू. पंचावन्न हजार तीनशे फक्त ) ची पुस्तके खरेदीकामी येणा-या खर्चास मा. प्रभाग समितीची मान्यता घेणेकामी सदरचा विषय नजिकच्या मा. प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी ठेवण्यात यावा

मा.सभापती यांचे परवानगीने येणारे ऐन वेळेचे विषय

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

क्र.इक्षे का/कावि/०४/ ४३/२०१४
दि. २९ /०१/२०१९